स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

येथील सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती

(पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

–: संशोधन विषय :–

मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा चिकित्सक अभ्यास.

–: संशोधक :–

पठाण अब्दुल गफ्फार जहाँगीर

एम.ए.(राज्यशास्त्र)बी.एड. एम.फिल.

लातूर

मार्गदर्शक

डॉ. सर्जेरावशिंदे

प्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय

चाकूर जि. लातूर

– संशोधन केंद्र –

पीपल्स कॉलेज, नांदेड

(2015 – 2016)

‘‘मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्रविचारांचा चिकित्सक अभ्यास.’’

प्रस्तावना :—

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये अनके भारतीय नेत्यांनी महत्वपूर्णयोगदान दिलेले आहे. त्यामध्ये लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू, इत्यादी विचारवंताचा प्रामुख्याने समावेश होतो. भारताला स्वातंत्र्य मिळावे या हेतूने अनेक आधुनिक मुस्लिम विचारवंतांनी सुध्दा आपला सहभाग नोंदविलेला होता. या मुस्लिम विचारवंतात सर सय्यद अहमदखान, डॉ. महंमद इक्बाल, बॅरिस्टर मोहम्मद अली जिना आणि, मौलाना अबुल कलाम आझाद इत्यादी मुस्लिम नेत्यांनी आपला सहभाग स्वातंत्र्य आंदोलनात दिलेला आढळतो. पण या मुस्लिम विचारवंतामध्ये मौलाना अब्दूल कलाम आझादाचे स्थान दुस—या मुस्लिम विचारवंतापेक्षा श्रेष्ठ व मोलाचे मानले जाते.

आधुनिक काळातील एक श्रेष्ठ नेते, पत्रकार, स्वातंत्र्य आंदोलनातील नेते, ब्रिटीश सत्तेचे विरोधक, हिंन्दु — मुस्लिम ऐक्याचे अग्रदूत राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते लोकशाही, समाजवादाचे समर्थक, धर्मनिरपेक्ष विचारांचे खंबीर पुरस्कर्ते, राजकीय विचारवंत, बुध्दीनिष्ठ, मुस्लीम लीग पक्षाचे व व्दिराष्ट्रवादाचे विरोधक, स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून मौलाना अबुल कलाम आझाद यांची सर्व भारतीयांनाच नव्हे तर जगाला त्यांची ओळख आहे.

१९ व्या आणि २० व्या शतकांमध्ये उदयास आलेल्या मुस्लिम विचारवंतांमध्ये मौलाना अबुल कलाम आझादांचे स्थान अग्रस्थानी मानले जाते. इ.स. १८८८ते १९५८ हा आझादांचा जीवन कालखंड मानला जातो. ब्रिटीश सत्तेचे कट्टर विरोधक होते परंतु इतर जहाल मुस्लिम नेत्यांप्रमाणे सामाजिक सुधारणांच्या बाबतीत ते प्रतिगामी नव्हते तर पाश्चात्य शिक्षण पध्दतीचे उदारमतवादाचे आणि धर्मनिरपेक्ष राजकारणाचे पुरस्कर्ते होते. भारतीय स्वातंत्र्य लढयात मुस्लिम लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांनी १९०८ साली इराण, इजिप्त या देशांना भेटी देवून तेथील स्वातंत्र्य लढयाची प्रेरणा घेऊन भारतातील मुस्लिम समाजातील लोकांना स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी करण्यासाठी व जनजागृती निर्माण करण्यासाठी वाटचाल सुरू केली. हिन्दु —मुस्लिम ऐक्य निर्माण करून ‘धर्मनिरपेक्ष राष्ट्राची’ मांडणी केली. इ.स. १९१२ ला ‘‘ अल—हिलाल ’’ व १९१४ साली ‘‘अल—बलाग’’ वृत्तपत्रांच्या माध्यमातून ब्रिटीश सत्तेविरोधात भारतीय जनमानसालास्वातंत्र्याचे धडे दिले व जनजागृती केली.ब्रिटीश सत्तेचेविरोधात आवाज उठवल्यामुळे अल्पावधीतच ‘‘अल—हिलाल’’ वृत्तपत्राला इतकी प्रसिध्दी मिळाली की त्यांच्या

वाचकांची संख्या ३० हजारापर्यंत पोहोचली. या दृष्टिने ते एक श्रेष्ठ पत्रकारही असल्याचे सिध्द होते.

मौलाना अबुल कलाम आझाद हे लोकशाहीवादी होते. त्यांनी लोकशाही प्रक्रिया गतिमान केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, स्त्रि–पुरूष समानता इ. लोकशाही मुल्यांच्या आधारे मानवतावादी इस्लाम धर्माची स्थापना आणि धर्मनिरपेक्ष विचार सरणीची मांडणी केली. आझादांनी इजिप्त मध्ये अरबी भाषेत प्रकाशित ‘‘अलमीरात अलमुसलमेह’’ या ग्रंथाचे भाषांतर करून लैगिंक समानतेसाठी संघर्ष करत असलेल्या महिलांची व्यथा मांडली. या विचारसरणीच्या मांडणीमुळे ते एक लोकशाहीवादी असल्याचे दिसून येते. मौलाना आझादांवर धर्माचा प्रभाव दिसून येतो ते म्हणतात की, ‘‘कुराणाप्रमाणे वागावे, कुराणाला सोडून दुसऱ्या कोणत्याही विचाराकडून मार्गदर्शन घेणारा मुस्लिम असूच शकत नाही. इतर समाजाच्या दृष्ठिकोणाप्रमाणे वागावे लागने यासारखी लाजीरवाणी गोष्ट नाही. इस्लामने दोन गोष्टी शिकविल्या आहेत. स्वातंत्र्य देणे तसेच घेणे. ’’ म्हणून त्यांच्या लिखाणात व राजकीय विचारात कुराणाचा प्रभाव दिसून येतो. यावरून त्यांच्यावर इस्लाम धर्माचा प्रभाव होता. असे असले तरी धार्मिक मुलतत्वादाचा पुरस्कार न करता सर्व धर्म सहिष्णुतावादाचा विचार समाजामध्ये रूजवला.

मौलाना आझाद समाजवादी विचारवंत होते. त्यांच्या मते ‘‘जात जमातवादाला छेदणाऱ्या वर्ग जाणीवांच्या आधारे स्वतंत्र भारताचे नागरिक संघटित होतील आणि समाजवादाच्या मार्गाने वर्गा–वर्गातील तफावत कमी करता येईल. असे त्यांचे मत होते. त्यांनी लोकशाही आणि समाजवादात समन्वय घडवून आणला. त्यांच्या मते,‘‘लोकशाही आणि समाजवाद’’ यांच्यात मुळीच अंतर्विरोध नाही, उलट लोकशाहीच्या यशासाठी ज्या पूर्व अटी आवश्यक असतात ते फक्त समाजवादातूनच पूर्ण होऊ शकतात.‘इस्लाम व समाजवाद’ या दोहोंतील समान सुत्रांची ही त्यांनी नोंद केली आहे. यावरून ते एक समाजवादी विचारवंत होते. मौलाना आझाद हे हिंदु – मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. त्यांनी इ.स. १९२३ साली दिल्ली कॉग्रेसच्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले, ‘‘हिन्दु मुस्लिम ऐक्याशिवाय स्वराज्य येणार असेल तर ते मी नाकारेन.’’ आझाद कॉग्रेसचे सर्वात तरूण अध्यक्ष होते. परंतु त्यांनी या काळात इ.स. १९४० साली अत्यंत नाजूक परिस्थितीत त्यांच्याकडे पुन्हा एकदा कॉंग्रेसचे अध्यक्षपद देण्यात आले.

मौलाना आझाद हे एक राष्ट्रवादी नेते होते. त्यांच्या राष्ट्रवादाचे दोन टप्पे पडतात सुरूवातीच्या पहिल्या टप्यात ते ‘मुस्लिम राष्ट्रवादी’ होते तर नंतरच्या दुसऱ्या टप्यात ते ‘भारतीय राष्ट्रवादी’ म्हणून दिसून येतात. त्यांच्या विचारात ‘राष्ट्रवाद व इस्लाम’ यांचा सुंदर असा मिलाफ दिसून येतो. तसेच राष्ट्रवादाला त्यांनी आंतरराष्ट्रवादाशी जोडलेले दिसून येते.

त्यांनी इस्लाम विश्वबंधुत्व निर्माण केले. 'द हिंदु' या वृत्तपत्राने त्यांच्या मृत्यूनंतर असे म्हटले की, ''त्यांच्या मृत्यूने एक निर्भय राष्ट्रवादी नेता हरवला आहे.'' मौलाना आझाद फाळणीचे कट्टर विरोधक होते. इ.स. १९३० ला मुस्लिम लीगच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना महंमद इकबाल यांनी ''द्विराष्ट्राची'' कल्पना मांडली, इ.स. १९३७ नंतर बॅ. जीना या 'द्विराष्ट्र' कल्पनेचा पुरस्कार करू लागले आणि १९४० ला त्यांनी पाकिस्तानची निर्मिती हे आपले ध्येय असल्याचे घोषित केले. वरील मुस्लिम विचारवंतांच्या विधानांचे खंडन करताना आझाद म्हणाले की, ''भारतातील मुस्लिम आणि हिंदू गेली हजाराहुन अधिक वर्षे एका देशात रहात आहेत. एवढया प्रदिर्घ काळांचे त्यांच्यात ऐतिहासिक संबंध आहेत. हजार वर्षाच्या इतिहासातील हिंदु–मुस्लिमांच्या सामुहिक प्रयत्नांनी भारतीय संस्कृतीला समृध्द बनविले आहे. आपली भाषा, संस्कृती, कला, वाड.मय सामाजिक चालीरिती या सर्वांवर हिंदू–मुस्लिमांच्या सामुहिक प्रयत्नांची छाप आहे.'' असे दाखले देत त्यांनी फाळणीला विरोध केला. मौलाना आझाद स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांच्या विचारावर महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. म. गांधी समवेत त्यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग दिला, खिलाफत, असहकार, भारत छोडो, चलेजाव दांडीयात्रा इ. आंदोलनात सहभाग दिला. त्याचबरोबर अनेकदा कारावासही भोगला. भारतीय स्वातंत्र्यपूर्वअनेक समित्यांचे अध्यक्ष म्हणून ही कामगिरी केली. सिमला परिषद, ऐक्य परिषद इत्यादी अनेक समित्यांचे अध्यक्ष व सदस्य म्हणून त्यांचे कार्ये उल्लेखनीय आहे.

मौलाना आझादांवर पवित्र कुराणाचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी पवित्र कुराणाचा अर्थ लावला. पवित्र कुराणाच्या आठ भागांचा तर्जुमा (अर्थ) लिहिला आहे. त्यांचा ग्रंथ, ''कुराण भाष्य'' म्हणून प्रसिध्द आहे. त्यांच्या राजकीय विचारांवर कुराणाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्या मते, "कुराणाप्रमाणे वागावे व कुराण सोडुन दुस—या गोष्टींवर विश्वास ठेवणारा मुस्लिम असुच शकत नाही ." असे त्यांचे मत होते. यावरून त्यांच्या समग्र विचारांमध्ये कुराणाचा प्रभाव दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळातील मौलाना आझाद हे भारताचे पहिले केंद्रीय शिक्षण मंत्री असूनत्यांचे कार्यस्मरणीय आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडवून आणले. त्यांनी इ.स. १९४८ चे विद्यापीठ शिक्षण मंडळ, इ.स. १९५२ चे विद्यापीठ शिक्षण मंडळ, खरगपूर इंस्टिटयुट ऑफ हायर टेक्नॉलाजी, विद्यापीठ अनुदान आयोगाची निर्मिती, बारा कलमी कार्यक्रम इत्यादी त्यांची केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून महत्वपुर्ण कार्य होय. त्यांचा सुप्रसिध्द ग्रंथ "इंडिया विन्स फ्रिडम." हा आहे. या ग्रंथात त्यांनी आपले धार्मिक व राजकीय व तसेच फाळणी विषयक विचार मांडले आहेत. त्यांच्याकडे एक राजकीय तत्वज्ञ

म्हणून पाहिले जाते. या विचारानेच सदरील विषयाची निवड केली आहे. पंडीत जवाहरलाल नेहरूनी म्हटल्याप्रमाणे, “मध्ययुगीन विदवत्ता आठराव्या शतकातील विवेकवाद (बुध्दीवाद) आणि आधुनिक दृष्टीकोण यांचे मिश्रण आझादांच्या समग्र विचारातून बघायला मिळते.” यावरून असे म्हणता येईल की, समग्र शैक्षणिक, राजकीय,धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक विचारांची मांडणी आणि कार्य अशी दुहेरी भूमिका जगामध्ये ज्या सर्वश्रेष्ठ विचारवंतानी बजावली तशीच भुमिका मौलाना अबुल कलाम आझादांनी पार पाडली आहे. म्हणून ‘‘ मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा चिकित्सक अभ्यास’’ करणे संयुक्तिक ठरते.

आज सार्वजनिक जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दहशतवाद, धार्मिक मुलतत्ववाद,प्रशासकीय दिरंगाई, प्रादेशिकतावाद, जातीयवाद,असमानता,महिलांवरील अत्याचार, मानवी हक्कांचे उल्लंघन यासारख्या घटनांना रोखण्यासाठी हयाबाबी अराजकतेच्या द्योतक आहेत. या सर्व आव्हांनाना रोखण्यासाठी मौल्यवान विचारसरणी मौलाना अबुल कलाम आझादांनी मांडली आहे. आझादांवर कोणा—कोणाचा प्रभाव होता? आझादांनी त्यास कसा प्रतिसाद दिला? त्यांच्या विचारांचा विकास कसा होत गेला? कुराणांचे भाष्यकार म्हणून आझादांचे योगदान कोणते? स्वातंत्र्य आंदोलनातील कार्य व योगदान कोणते? हिंदु—मुस्लिम ऐक्यासाठी त्यांचे कार्य कोणते? लोकशाहीच्या बाबतीत त्यांचेविचार कशाप्रकाराचे होते? आझादांचा लोकशाही समाजवाद कशा प्रकाराचा होता? त्यांचा राष्ट्रवाद कोणत्या प्रकाराचा होता? भारताच्या फाळणीबाबत आझादांची भूमिका काय होती? कॉग्रेसचे अध्यक्ष म्हणून कोणती कामगिरी केली होती? स्वातंत्र्योत्तर काळात स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी कोणते कार्य केले? या सर्व गोष्टींचा ऊहापोह करणे या संशोधनामागचा मुळ उद्देश आहे. या अनुषंगानेच “मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा चिकित्सक अभ्यास.” या विषयाचे संशोधन व अध्ययन प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

सदरीलशोध प्रबंधाचा आराखडा हा प्राथमिक असून प्रत्यक्ष संशोधन करत असताना या शोधप्रबंधात आवश्यकतेनुसार कमी—जास्त बदल करणे अपेक्षित आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:—

१. मौलाना अबुल कलाम आझादांच्या भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील कार्यांचा अभ्यास करणे.

२. मौलाना अबुल कलाम आझादांच्या समग्र विचारांचे इस्लाम धर्मात असलेले मुळ शोधणे.

३. भारतीय अखंडतेबद्दल मौलाना आझादांच्या भुमिकेचा आढावा घेणे.

४. हिंदु—मुस्लिम ऐक्याबद्दल त्यांच्या असणा—या विचारांचा अभ्यास करणे.

५. मौलाना अबुल कलाम आझाद आणि तत्कालीन भारतीय राजकीय नेत्यांच्या विचारांचा तौलनिक अभ्यास करणे.

६. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणीक कार्यांचा आढावा घेणे.

संशोधनाची ग्रहितके:—

१. मौलाना अबुल कलाम आझादाची राजकीय विचारधारा धार्मिक विचाराने प्रेरीत होती.

२. मौलाना अबुल कलाम आझादांचे विचार लोकशाहीवादी आहेत.

३. मौलाना अबुल कलाम आझादांचा राष्ट्रवाद आंतरराष्ट्रवादाशी समन्वय साधणारा आहे.

४. मौलाना अबुल कलाम आझादांचा हिंदु—मुस्लिम ऐक्यासंबंधीचा विचार धर्मनिरपेक्षतेला पोषकअसा विचार आहे.

५. मौलाना अबुल कलाम आझादांचे शिक्षणक्षेत्रातील कामगिरी महत्वपुर्ण आहे.

समस्या सूत्रण:—

आधुनिक भारताच्या जडण—घडणीत संमिश्र राष्ट्रवादाची फार मोलाची भूमिका राहिली आहे परंतु हा संमिश्र राष्ट्रवाद कशा पध्दतीने निर्माण झाला? संमिश्र राष्ट्रवादाला आकार देण्यासाठी कोणत्या विचारांची मांडणी करण्यात आली? स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भारतातील इतर मुस्लिम विचारवंत तथा मौलाना आझाद यांच्या विचारात कोणती साम्यस्थळे तथा भेद स्थळे होती? आझादांची विचारधारा हिंदू — मुस्लिम ऐक्याची होती का? त्यांच्या समग्र विचारात धर्माचा प्रभाव होता का? ते धार्मिक मुलतत्ववादाचे नेते होते का? आझादांच्या समग्र विचारात धार्मिकतेचा प्रभाव होता का? मौलाना आझाद फाळणीचे विरोध करणारे होते का? मौलाना आझाद लोकशाही व समाजवादाचे पुरस्कर्ते होत का? मौलाना आझाद कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून केलेली कामगिरी योग्य होती का? भारताचे पहिले केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहेत का? अशा अनेक समस्यांचे सुत्रण करून संशोधनाद्वारे उत्तरेशोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधनाचे क्षेत्र/व्याप्ती:—

मौलाना अबुल कलाम आझादांच्या समग्र विचारांचा आणि कार्यांचा अभ्यास केल्यास त्यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक वशैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रामध्ये योगदान व कार्य दिसून येते.

१. मौलाना अबुल कलाम आझाद यांचा रांजकीय विचारांचा अभ्यास करणे.

२. मौलाना अबुल कलाम आझादांच्या धार्मिक विचार अभ्यासणे.

३. मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या ग्रंथातून व लेखनातून त्यांच्या विचारांचे संकलन करूनमांडणी करणे.

४. मौलाना अबुल कलाम आझादांनी इंग्रजाविरूध्द दिलेला लढा, स्वातंत्र्यपूर्व आंदोलनातील कार्य, "अल हिलाल" व "अल—बलाग" वृत्तपत्रांचे संपादक म्हणून केलेले कार्ये आणि कॉग्रेस पक्षाचे सर्वात तरूण अध्यक्ष महणून केलेल्या कामगिरीचाशोध घेणे.

५. मौलाना आझादांचे हिंदू—मुस्लिम ऐक्यासंबंधीच्या विचाराचा व राष्ट्रवादी विचारअभ्यासणे.

६. मौलाना आझादांचे लोकशाही, समाजवाद आणि शैक्षणिक इत्यादी कार्यांचा अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनात मौलाना आझादांच्या समग्र विचारांचा व कार्याचा अभ्यास करण्यात येईल.

संशोधन विषयाचे महत्व :—

२० व्या शतकात मौलाना आझादांनी साहित्यातुन व प्रत्यक्ष कार्यातुन समतावादी, लोकशाही, मानवतावादी, परिवर्तनवादी धर्मनिरपेक्ष समाजाची प्रतिस्थापणा,मुस्लिम धर्मियात जनजागृती तसेच मुस्लिम लोकांचा स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी, राष्ट्रवादी नेता, शिक्षणतज्ञ, एक श्रेष्ठ पत्रकार, फाळणीचे विरोधक म्हणून त्यांचे योगदान महत्वाचे आहे. समताधिष्ठित भारतीय समाज व लोकशाही राज्यव्यवस्था ही मौलाना आझादांची राजकीय विचारसरणी आजही मौल्यवान आहे. त्यासाठीच "मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा चिकित्सक अभ्यास " या विषयाचे अध्ययन महत्वाचे आहे.

संशोधन प्रणाली

अ. तथ्य संकलनः—

१. प्राथमिक स्त्रोतः—

मौलाना आझादांच्या साहित्याचा आणि विचाराच्या अभ्यासकांच्या मुलाखती घेणे. तसेच प्रश्नावलीद्वारे तथ्य संकलन करणे.

२. द्वितीयक स्त्रोतः—

मौलाना आझादाची महत्वपुर्ण ग्रंथ, अनुवादित ग्रंथ, तत्कालीन ग्रंथ, महत्वपूर्ण भाषणे, नियत कालिकांचा वापर करून तथ्य संकलन करणे.

ब. विश्लेषण पध्दतीः—

" मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा चिकित्सक अभ्यास". या विषयाचा अभ्यास करीत असताना ऐतिहासिक, वर्णनात्मक, तुलनात्मक, इत्यादी संशोधन पध्दतींचा आधार घेतला जाणार आहे.

संशोधनाचा आराखडाः—

"मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा चिकित्सक अभ्यास." याशिर्षकाअंतर्गत निवडलेल्या प्रस्तुत शोध प्रबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

—: अनूक्रमणिका :—

प्रकरण १ ले प्रस्तावना :—

"प्रस्तावना" या पहिल्या प्रकरणात विषय प्रवेशासह विषय निवडीची पाश्वभूमी, संशोधन विषयाची उद्दिष्टये, गृहितके, संशोधन पध्दती, संशोधनाचे महत्व, संशोधन प्रणाली, तथ्यसंकलन, विश्लेषण पद्धतीव प्रकरण रचना अशी अभ्यास मांडणी करण्यात आली आहे.

प्रकरण २ रे. "मौलाना अबुल कलाम आझाद यांचे व्यक्तीत्व आणि वैचारिक जडण–घडण."

या दुस–या प्रकरणात मौलाना आझाद पुर्वकालीन परिस्थिती, जन्म आणि बालपण, आझादांवरील प्रभाव शिक्षण, आझादांचे ग्रंथसंपदा, व वैचारीक विश्‍व, अल – हिलाल व अल बलाग वृत्तपत्रातील योगदान, क्रांतीकारी गटात सहभाग, भारतीय राजकारणात प्रवेश, त्यांच्या वैचारिक जडण–घडणीमध्ये त्यांच्या आई–वडील, तसेच मौलाना शिबली, सर सय्यद अहेमद खॉन, चिरागअली आणि अमीरअली, पैगंबर, पवित्र कुराण, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादी प्रभावाच्या वैचारिक जडण– घडणीमध्ये मांडणी केली आहे.

प्रकरण ३ रे"मौलाना अबुल कलाम आझाद यांचे धार्मिक विचार."

या तिस–या प्रकरणात धर्माचा अर्थ, व्याख्या, विविध धर्माचा थोडक्यात पूर्व आढावा, कुराणाचा संदेश, महंमद पैगम्बरानी दिलेल्या संदेश व त्यांच्यांवर पडलेला प्रभाव, इस्लाम धर्माची शिकवण, भारतीय स्वातंत्र्य लढ्यत मुस्लिम लोकांचा सहभागव जनजागृती करण्यासाठी धर्माचा आधार, त्यांच्या समग्र विचारातील धर्माचा प्रभाव, राजकारण व धर्म यासंबंधी विचार, धर्माच्या दोन बाजुत फरक, मुस्लिमांच्या वर्तणुकीवर टिकाइत्यादी धार्मिक विचारांचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण ४ थे"मौलाना अबुल कलाम आझादा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान व भारताच्या फाळणी बाबतचे विचार,"

या चौथ्या प्रकरणात मौलाना आझादांच्या पूर्व परिस्थितीचा आढावा, तत्कालीन मुस्लिम नेत्यांचे योगदान, ब्रिटिश सत्तेविरूध्द "अल– हिलाल" व "अल – बलाग" वृत्तपत्रांचा शस्त्र म्हणून वापर, खिलाफत चळवळ, असहकार चळवळ, दांडीयात्रा, सविनय कायदेभंग, भारत छोडो स्वांतंत्र्य आंदोलनातील हिंदु–मुस्लिम दंगे, कॉग्रेस पक्षाचे तरूण अध्यक्ष म्हणून केलेली कामगिरी, कॉग्रेसकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोण, मुस्लीम लीगला विरोध, आझादांची फाळणी विषयीची भूमिका, फाळणीला विरोध, मुस्लिम नेत्यांवर टिका, भारतीय अखंडत्व टिकविण्याचा प्रयत्न, फाळणीसाठी कॉग्रेसवर केलेली टिका. फाळणी थांबविण्यासाठी दिलेली भाषणे. या विविध योगदान व कार्याचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण ५ वे :–“मौलाना अबुल कलाम आझाद हिंदु–मुस्लिम ऐक्यासंबंधीचे विचार आणि राष्ट्रवादा संबंधी विचार,”

या पाचव्या प्रकरणात हिंदु–मुस्लिम यांच्यातील स्वातंत्र्यपुर्व कालखंडातील संघर्षाची कारणे, हिंदु–मुस्लिम ऐक्य निमार्ण करून ब्रिटीष सत्तेविरूध्द लढा, स्वातंत्र्यासाठी हिंदु–मुस्लिम ऐक्याची गरज, हिंदु–मुस्लिम ऐक्यासाठी जनजागृती संदेश, अल्पसंख्यांक व बहुसंख्याक भेद अमान्य, हिंदु–मुस्लिम ऐक्यांच्या विचारातुन भारतीय अखंडत्व टिकविण्याचा प्रयत्न, विविध मुस्लिम नेत्याचे हिंदू‘–मुस्लिम ऐक्यासंबंधीचा पुर्व आढावा, हिंदु–मुस्लिम ऐक्याची आवश्यकता तसेच राष्ट्रवादासंबंधी विचारात त्यांच्या राष्ट्रवादाच्या टप्प्यांचा अभ्यास, त्यांचा राष्ट्रवाद निर्माण होण्याची कारणे, राष्ट्रवाद कोणत्या प्रकारात मोडतो, कोण–कोणत्या राष्ट्रवादी नेत्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता, राष्ट्रवादाला आंतरराष्ट्रवादाशी जोडले, या सर्व विचारांचा व कार्यांचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण ६ : मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या लोकशाही, समाजवादी विचार व स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून केलेले कार्याचा अभ्यास’’

या सहाव्या प्रकरणात – लोकशाहीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, लोकशाहीसंबंधी आझादांनी मांडलेले विचार, इस्लाम व लोकशाही यांचा समन्वय, तत्कालीन मुस्लिम नेत्यांच्या लोकशाही संबंधी विचारांचा पूर्व आढावा, आणि समाजवादाचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, मौलाना आझादांचे समाजवादाबद्दल असलेल्या समकालिन नेत्यांच्या समाजवादाचा पूर्व आढावा, तसेच भारताचे पहिले शिक्षण मंत्री म्हणून केलेल्या कार्याचा आढावा अनेक विद्यापीठ मंडळांची सथापना, विद्यापीठ आयोगाची सथापना,बारा कलमी कार्यक्रम नैसर्गिक शिक्षण पध्दतीचा वापर या सहाव्या प्रकरणात अभ्यास केला जाईल.

प्रकरण ७ :''समारोप/निष्कर्ष ''

या सातव्या प्रकरणात संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, यांना केंद्रभूत मानून आणि मौलाना अब्दूल कलाम आझाद यांच्या समग्र विचारांचा व चिकित्सक अभ्यास केल्यास निघणारे निष्कर्ष व निरीक्षणे नोंदविले जातील.

मार्गदर्शक **संशोधक**

डॉ. सर्जेरावशिंदे
प्राचार्यतथा संशोधन मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय
चाकूर जि. लातूर

पठाण अब्दुल गफ्फार जहाँगीर
एम.ए.राज्यशास्त्रबी.एड. एम. फिल.
लातूर.

ठिकाण :– चाकूर

दिनांक :–

संदर्भ ग्रंथसूची :

मराठी ग्रंथ :—

१. डॉ. अलीम वकील, मौलाना आझाद धार्मिक आणि राजकीय विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००५.

२. अब्दूल कवाकी' देसनवी, भारतीय साहित्याचे निर्माते ;मौलाना आझादद्ध, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१३

३. शमशोदीन तांबोळी, आझाद कलाम, आक्षर मानव प्रकाशन, पुणे — २०११.

४. शेषेराव मोरे, कॉग्रेस आणि गांधीजीनी अखंड भारत का नाकारला ?, राजहंस प्रकाशन, पुणे — २०१२.

५. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, आधूनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर — २००३

६. प्रा. बी.बी. पाटील, राजकीय सिध्दांत आणि भारतीय राजकीय व्यवस्था ; भाग — १ द्ध , फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११

७. प्रा. शमशोदीन तांबोळी, मुस्लिम समाज प्रबोधन आणि विकास , नवीन उदयोग, पुणे, २०१०

८. अरूण सार्थी, हिंदू—मुस्लिम वैमनस्याची ऐतिहासिक मिमांसा, अस्मिता प्रकाशन, पुणे, २०१३

९. ब.ना. जोग, हिंदू—मूस्लिम ऐक्य : भ्रम आणि सत्य, उन्नति प्रकाशक मुंबई, १९९०

१०. फकरोदीन बेन्नूर, हिंदूत्व मुस्लिम आणि वास्तव, भूमि प्रकाशन, लातूर, २००७

११.जी.डी चिटणीस, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मुस्लिमांचा कार्यभाग, लोकवाङ्.मय गृह, मुंबई, २००४

१२. अब्दुल कादर मुकादम, चंद्रकोरीच्या छायेत, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०

१३. नरहर कुरूंदकर, शिवरात्र, देशमुख ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, पुणे, २०११

१४. डॉ. न.म. जोशी, मौलाना अबुल कलाम आझाद, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९९३

१५. प्रा. शमसुदिन तांबोली, मुस्लिम समाज व्यक्ती — विचार, नवीन उद्योग, पुणे २०१०

१६. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, हिन्दूस्थानाच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, जमदास ॲन्ड कंपनी, मुंबई, १९८८

हिंदी ग्रंथ

१७. अजय अनुपम, भारतीय राष्ट्रीय आंदोलन और मौलाना अबुल कलाम आझाद, खुदा बख्श ओरिएन्टल पब्लिक लायब्रेरी, पटना, २००७.

१८. अर्श मलसियानी, आधुनिक भारत के निर्माता मौलाना अबुल कलाम आझाद,सुचना और प्रसार मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, १९९४

१९. अब्दुल कवी दस्नवी, अबुल कलाम आझाद, साहित्य आकादमी, नई दिल्ली, २०१२

२०. रामफल सिंह हिंदु – मुस्लिम सांस्कृतिक एकता का इतिहास, राज पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, १९९४

इंग्रजी ग्रंथ :–

21- Moulana Azad, India Wins Freedom, Orient Longman Limited, Madras, 1988.

उर्दु ग्रंथ :–

२२. खालीक अंजूम, मौलाना अबुल कलाम आझाद ; सकसियत और कारनामे द्ध उर्दु ॲकॅडमी, दिल्ली २००३.

२३. मौलाना जियाओद्दीन इसलाही, मौलाना अबुल कलाम, दारूल मुसन्नफीन साहीबली अकॅडमी अजमगढ, १९९८

२४. रशीदोद्दीन खान, मौलाना अबूल कलाम आझाद – ; सकसीयत सियासत, पैगाम द्ध खौमी कॉन्सील, नई दिल्ली, २०००.

२५. अबु सलमान शहाजानपूरी, फैजाने अबुल कलाम खुदा बख्श ओरिएन्टल पब्लिक लायब्रेरी, पटना, २००२

२६. प्रा. मोहम्मद सौऊद अलाम काजमी, मौलाना अबूल कलाम आझाद और मुत्ताअला ए मजाहीब, नई दिल्ली, २०१३.

नियतकालिके

१. त्रैमासिक प्रकायन, दिल्ली.

२. आज – कल अबुल कलाम विशेषांक

३. परिवर्तनाचा वाटसरू, संपादक, अभयकांता, पुणे.
४. विचारशलाका, त्रैमासिक, संपादक, डॉ. नागोराव कुंभार, लातूर.
५. शोध – संपदा, त्रैमासिक, संपादक, डॉ. राजशेखर सोलापूरे, लातूर.

दैनिके

१. लोकसत्ता
२. लोकमत
३. इंडिया टाईम्स
४. ऐलान, साप्ताहिक
५. मौलाना अबुल कलाम आझाद , साप्ताहिक
६. मुस्लिम एक्सप्रेस ; साप्ताहिक द्ध

मार्गदर्शक | **संशोधक**

डॉ. सर्जेराव शिंदे
प्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय
चाकूर जि. लातूर

पठाण अब्दुल गफ्फार जहाँगीर
एम.ए.राज्यशास्त्रबी.एड. एम. फिल.
लातूर.

ठिकाण :–

दिनांक :–